धाराशिव जिल्हा 01-08-2024

# ‘लाडक्या भावां’साठी उपलब्ध केली ५०५ पदे

प्रतिनिधी | धाराशिव

‘लाडक्या बहिणींसाठी शासनाने जोरदार तयारी करून लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. आता ‘लाडक्या भावां’साठीही युद्धस्तरावर प्रयत्न केले जात आहेत. लाडक्या ‘भावां’ना नोकरी मिळण्यासाठी ५०५ पदे जिल्हा परिषदेने उपलब्ध केली आहेत. यामध्ये शिक्षक व ग्रामसेवकांच्याही पदांचा समावेश आहे.

लाडका भाऊ अर्थात मुख्यमंत्री युवाकार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत शासन निर्णयातील निर्देशांप्रमाणे जिल्हा परिषदेने शासकीय आस्थपनेमधील मंजूर पदाच्या ५ टक्के इतके उमेदवार कार्यप्रशिक्षणासाठी घेण्यासाठी कौशल्य विकास विभागाच्या संकेतस्थळावर ५०५ पदांची नोंद केली आहे. त्यामध्ये पशुसंवर्धन विभागाअंतर्गत पशुधन पर्यवेक्षक पदे ११, डाटा एन्ट्री ऑपरेटर १, परिचर ४, प्राथमिक शिक्षण विभागाअंतर्गत शिक्षक पदवीधर १००, प्राथमिक शिक्षक १५३, परिचर २०, कृषी विभागाअंतर्गत कृषी पदविकाधारक २, डाटा एन्ट्री ऑपरेटर १, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाअंतर्गत अभियंता २, व इतर पदांसाठी भरती आहे.